"नांदेड जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांची वाढती व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्ती : एक समाजशास्त्रीय अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानव्यविद्याशाखे अंतर्गत "समाजशास्त्र" विषयातील पीएच्.डी.पदवीसाठी सादर करावयाचा संशोधनपूर्व आराखडा

संशोधक

बाऱ्हाळीकर रामदास माधवराव

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.दत्ता किशनराव कदम

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,

हिमायतनगर, ता.हिमायतनगर, जि.नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्च २०२२

"नांदेड जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांची वाढती व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्ती : एक समाजशास्त्रीय अभ्यास"

०.१ प्रस्तावना :-

संशोधन अध्ययन करताना संशोधकाने प्रास्ताविकात किशोरावस्थेतील मुलांमध्ये वाढती व्यसनाधिनता व गुन्हेगारी वृत्ती ही ज्वलंत सामाजिक समस्या असून, आरोग्यास बाधक आहे तसेच किशोरावस्थेतील मुलांचे बालपण हिरावून घेणारी आहे. त्या अनुषंगाने संशोधनातून ही संकल्पना मांडताना विविध व्याख्यांचा समावेश केला आहे. किशोरावस्था म्हणजे काय? व्यसनाधिनता म्हणजे काय? गुन्हेगारी म्हणजे काय? या सर्वांचा मुलांच्या मनावर, आरोग्यावर व समाजावर होणारा परिणाम त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या यांचा अभ्यास केला जाणार आहे.

व्यसनाधिनता व गुन्हेगारी वृत्ती ही समस्या सार्वत्रिक समस्या आहे. एखाद्या विशिष्ट कुटुंबात, समाजात, विशिष्ट जाती-धर्मात किंवा गरीब-श्रीमंत यापुरतीच ही समस्या मर्यादित राहिली नसून, ती सर्वव्यापी समस्या बनली आहे. या समस्येने विकसनशील देशात तर गंभीर स्वरूप धारण केले आहेच पण बहुतांशी विकसनशील देशात किशोरवयीन मुले कुपोषित, दुर्लक्षित आहेत. व्यसनाधिनता व गुन्हेगारी वृत्ती या समस्येचे कौटुंबिक, सामाजिक व मित्र परिवार हे घटक कारणीभूत आहेत. ज्याचा परिणाम व्यसनी व गुन्हेगारी असलेल्या परिवारावरच नव्हे तर संपूर्ण समाजावर, आरोग्यावर, शिक्षणावर, वैयक्तिक व सामाजिक विकासावर तसेच किशोरवयीन मुलांच्या मानसिकतेवर दुष्परिणाम होत आहे.

किशोरवयीन मुले ही थोडी मौजमजा करण्यासाठी अमली पदार्थांचे सेवन करतात व काही काळानंतर त्या व्यसनी, मादक पदार्थांच्या आहारी जातात. किशोरांना व्यसनाधीनता व गुन्हेगारी वृत्तीकडे वळण्यास कुटुंब जबाबदार आहेत. काही पालक श्रीमंतीचा मोठेपणा करण्यासाठी मुलांचे हट्ट पुरवित असतात, नको त्या वयात त्यांना श्रीमंतीची, पैशाची जाण

करून देतात. एका ठराविक वयापर्यंत मुलांना त्या श्रीमंतीचा अनुभव मिळता कामा नये! आजकाल आई-वडील कामानिमित्त घराबाहेर असतात. लहान वयात जे लक्ष पुरविले गेले पाहिजे ते मुलांना मिळत नाही मग स्वाभाविकरित्या मुलांचे लक्ष विचलित होत आहे. ती मुले खेळण्यासाठी, कामासाठी बाहेर जात नाहीत. शरीर स्वास्थ्याचा आनंद नसेल तर त्यांना आयुष्यात नशा करण्यातच आनंद मिळेल. नशा हाच एक पर्याय त्यांच्याकडे उरतो. अमलीपदार्थांमुळे त्यांना नशाच नाही तर थोडा वेळ ताजेतवाने झाल्याचा आनंदही मिळतो. म्हणून मोठ्या प्रमाणात ही पिढी व्यसनाधीनता व परिणामी गुन्हेगारीवृत्तीकडे वळत आहे.

जोपर्यंत किशोरवयीन मुले मादक पदार्थांचे सेवन करत नाहीत तोपर्यंत त्यांना बेचैन वाटते. त्याचा गंभीर परिणाम त्यांच्या शारीरिक, भावनिक व सामाजिक जीवनात होत असतो. अशी परिस्थिती किशोरवयीन मुलांवर उद्‌भवण्यासाठी समाज व स्थानिक प्रशासन व पोलीस खातेही जबाबदार आहे. कारण, नांदेड शहरात किंवा जिल्ह्यात अनेक ठिकाणी दारू विकणारी दुकाने, देशी दारूचे दुकान, मागासवर्गीय दलित वस्त्यांच्या आसपासच पहायला मिळते. उच्चभ्रू वस्तीत अशी परवाना धारक दुकाने नसतात. यास काही प्रमाणात स्थानिक प्रशासन व पोलीस खातेही जबाबदार आहे. अनेक दलित वस्त्यांमध्ये विनापरवाना चोरून, छुप्या मार्गाने पोलीस खात्यास धरून मादक पदार्थांची विक्री केली जाते. नांदेड शहरात व जिल्ह्यातही गावोगावी जाणीवपूर्वक मादक पदार्थांची विक्री केली जाते. याकडे मुद्दमहुन स्थानिक प्रशासन व पोलीस खाते दुर्लक्ष करीत आहे. याचा परिणाम जागोजागी मादक, अमली पदार्थ उपलब्ध झाल्यामुळे त्यांचे सेवन करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होताना दिसून येत आहे. समाजही नाईलाजास्तव याकडे दुर्लक्ष करीत आहे. याचा परिणाम अनुकरणातून किशोरवयीन मुलेही या मादक, अमली पदार्थांकडे खेचली जाऊन परिणामी व्यसनाधीन होताना दिसत आहेत. व्यसनाची पूर्तता करण्यासाठी किशोरवयीन मुले घरातील पैसे चोरणे, घरातील सामान चोरून विकणे, लहान-मोठ्या चोऱ्या करणे तसेच आपल्या व्यसनाची पूर्तता होईल इथपर्यंत कुठेतरी काम करतात. परिणामी वाईट मार्गाकडे वळलेली दिसून येतात. यामुळे दिवसेंदिवस गुन्हेगारी वृत्तीत व व्यसनाधिनतेत वाढ होत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका त्यात ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभा या सर्व निवडणुकीत मतदारांकडून मतदान मागण्यासाठी राजकीय पुढारी गोरगरीब, आर्थिक दुर्बल लोकांना मतदानासाठी पैसे, दारू, अमली पदार्थ तसेच खाण्यापिण्याचे अमिष दाखवून व्यसनाकडे वळवतात. म्हणून आज शहरापासून गाव, वाडी, तांडा या वस्त्यांमध्ये सर्रासपणे दारू दिली जाते. निवडणुका संपल्यानंतर याचा परिणामसुद्धा होतो. काही गावातील हॉटेल, पानटपरी, किराणा दुकानातच मादक पदार्थांची विक्री केली जाते. काही गावात तर गावालगतच बार, धाबे चालवली जातात. याचा परिणाम असा होतो की, देशी दारू पिणाऱ्यांचे प्रमाण वाढताना दिसून येते. प्रौढ मुलांचे अनुकरण करून किशोरवयीन मुले व्यसनाधीनतेतून गुन्हेगारी वृत्तीकडे वळली जातात.

आज प्रत्येक राजकीय पुढारी आपले राजकीय प्रदर्शन दाखवण्यासाठी निवडणुकांमध्ये रॅली काढली जाते. या रॅलीत जास्तीत जास्त लोकांना सामावून घेण्यासाठी त्यांना दारूचे, अमली पदार्थांचे व पैशांचे अमिष दाखवले जाते. यातून मुले व्यसनाधीनतेकडून गुन्हेगारीवृत्तीकडे वळली जात आहेत. यास समाज व स्थानिक प्रशासन कारणीभूत आहेत. आज तरूण मुले कोणत्या ना कोणत्या व्यसनाने ग्रासली आहेत. आजच्या युगात नवनवे व्यसनाचे प्रकार निघाले आहेत. त्यांची नशा करण्यासाठी तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, खर्रा, व्हाईटनर, गांजा, सुलोचन, पेट्रोल, झंडूबाम, ड्रग्ज, अफिम इत्यादी अनेक प्रकारच्या गुंगी, नशा आाणणाऱ्या मादक पदार्थांच्या आहारी गेले आहेत. त्यामुळे त्यांच्या शरीरावर व मनावर विपरीत परिणाम होऊन ते अनेक प्रकारचे गुन्हे करतात. त्यामुळे त्यांच्यात व्यसनाधिनता व गुन्हेगारी वृत्तीची दिवसेंदिवस वाढ होत आहे. या सर्व बाबींचा विपरीत परिणाम समाजावर होऊन आपल्या समाजात, देशात आदर्श नागरीक व आदर्श सुव्यवस्था प्रस्थापित होण्यास अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी, देशाच्या विकासाच्या वाटचालीवर विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून **"नांदेड जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांची वाढती व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्ती : एक समाजशास्त्रीय अभ्यास"** या गंभीर समस्येवर संशोधन करून त्यांना आळा घालणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

(अ) किशोरावस्था :-

किशोराला इंग्रजी 'ॲडोलसन्स' असे म्हणतात. ॲडोलसन्स (Adolescence) ही संज्ञा/शब्द ॲडलस केअर या शब्दापासून तयार झालेला आहे. 'ॲडलस' केअर म्हणजे परिपक्व होणे किंवा वाढ होणे होय. साधारणतः व्यक्तीची भावनिक, मानसिक आणि सामाजिक अशी परिपक्वता म्हणजे किशोरावस्था होय. या अवस्थेमध्ये वय मुलींमध्ये अकरा वर्षांपासून तर मुलांमध्ये बारा वर्षांपासून सुरू होऊन ते अठरा वर्षापर्यंत मानले जाते. **स्टॅनलेहॉल** यांना 'किशोरवयीन मानसशास्त्राचा जनक' असे म्हणतात. किशोरावस्थेचे वर्णन त्यांनी "वादळ आणि तणावाचा कालखंड असे केलेले आहे." किशोरावस्थेतील १३ ते १९ वर्षापर्यंतचा कालखंड समाविष्ट असतो. ही एक अतिशय कठिण व समस्यापूर्ण अशी अवस्था असते. **जागतिक आरोग्य संघटनेने** किशोरावस्थेबाबत म्हटले आहे की, "किशोरावस्था, बालपण आणि तारूण्य यांच्या दरम्यान वाढ आणि विकासाचा संक्रमणातील टप्पा होय."

(ब) व्यसनाधीनता :-

व्यसन म्हणजे व्यक्तीला लागलेली अशी एखादी सवय जिच्यामुळे संबंधित व्यक्तीचे मोठ्या प्रमाणावर शारीरिक, मानसिक व सामाजिक नुकसान होत असूनही आपल्या त्या सवयीत बदल करणे त्या व्यक्तीला शक्य होत नाही त्यामुळे व्यसनाच्या आहारी गेलेली मुले ही व्यसनाची गरज भागविण्यासाठी चोरी करणे, घरातील पैसे चोरी करणे असे गुन्हे करायला लागतात व गुन्हेगारीकडे वळतात. व्यसनाधीनतेमध्ये तंबाखु, गुटखा, सिगारेट आणि मग दारू असे सेवन करून बधणं सुरू होत. व्यसनाधीनेबद्दल **जे.एल.गिलीन** आपले मत मांडतात. त्यांच्या मते, "मद्यपान एक स्थायी अवस्था की ज्यामध्ये मद्याच्या सेनाची सदैव इच्छा असते. मात्र त्याचे व्यक्तीच्या शरीर व मनावर गंभीर परिणाम होतात." तर **सेव्हन बेकर** यांनी व्यसनाधीनेबद्दल आपले मत व्यक्त केले, त्यांच्या मतानुसार "मद्यपान एक अशी व्याधी आहे की ज्यामध्ये व्यक्ती जीवनातील सामान्य प्रश्नांना तोंड देण्यासाठी सतत मद्यप्राशन करतो."

(क) गुन्हेगारी :-

'गुन्हेगारी म्हणजे गुन्हा करणे', ही गुन्हेगारी उपजत येत नसून ती एकून, पाहून, प्रलोभनांनी मोहित होऊन व त्याचे अनुकरण येते. वर्तमानपत्रे, चित्रपट आणि उत्तान जाहिरातींच्या प्रमाण व्यक्तींवर पडला आणि त्याप्रमाणे वागुन पाहण्याचे मनात आल्यानंतर जर जवळच्या कुटुंबीय, मित्र, सवंगडी यांच्यापासून प्रोत्साहन मिळते तेव्हांच गुन्हा घडत असतो. किशोरावस्थेतील मुले ही गुन्हेगारीकडे वळण्याची शक्यता जास्त असते कारण हे वय अनुकरणाचे, संस्काराचे असते. आधीपासूनच गुन्ह्याची सवय लागलेल्या मित्रांचा सहवास असेल तर गुन्ह्याची सवय लागते. **प्रसिद्ध विचारवंत हर्टन आणि लोस्ली** यांनी गुन्हेगारीविषयी आपले मत नोंदवले आहे. ते म्हणतात, "गुन्हा म्हणजे कायद्याचे केलेले उल्लंघन होय." तर **गिलीन व गिलीन** यांच्या मते, "कायद्याच्या दृष्टिकोनातून गुन्हा म्ळणजे त्या देशातील कायद्याचे उल्लंघन होय."

(ड) किशोरवयीन मुलांना गुन्हेगार समजण्याची भारतातील पद्धती :-

भारतात सात वर्ष वयापेक्षा कमी वयाच्या मुलाने केलेल्या कृत्याला अपराधच समजले जात नाही. ७ ते १२ वर्षाच्या मुलाला, त्याने केलेल्या कृत्याच्या परिणामांची जाणीव नसते, या कारणाने त्याने केलेल्या अपराधाबाद्दल त्याला सजा होत नाही. यानंतर १८ वर्षे वयापर्यंतच्या मुलाला किशोर समजले जाते आणि त्याच्या हातून झालेल्या गुन्ह्यासाठी त्याला बालसुधारगृहात पाठविले जाते. २००० सालापर्यंत यासाठी १६ वर्षे वयाची मर्यादा होती.

(इ) किशोरवयीन व्यसनाधीन व गुन्हेगार मुलांची भारतातील स्थिती :-

देशात बालगुन्हेगारीमध्ये दरवर्षी वाढ होत आहे. यात मध्यप्रदेश व महाराष्ट्रात सर्वाधिक बालगुन्हेगारांवर गुन्हे दाखल आहेत. त्यात देशात बालगुन्हेगारांना गंभीर गुन्ह्याच्या प्रकारात सर्वाधिक अटक करण्यात आली आहे. यात किशोरवयीन मुलांना चोरी, बलात्काराच्या विरोधी गुन्ह्यात पकडण्यात आलेले आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोचा २०१४

च्या अहवालानुसार देशात २०१२ मध्ये २७ हजार ९३६ किशोरवयीन बालगुन्हेगारांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. २०१४ मध्ये त्यात वाढ होऊन ३३ हजार ५२६ गुन्हे दाखल आहेत. त्यात चोरीचे सर्वाधिक ६०८८ गुन्हे दाखल असून महाराष्ट्रातील १२१६ किशोरवयीन बालगुन्हेगारांचा समावेश आहे. प्रस्तुत अभ्यासात २०१४ च्या पुढील आकडेवारी अभ्यासण्यात येईल.

(ई) किशोरवयीन व्यसनाधीन व गुन्हेगार मुलांची महाराष्ट्रातील स्थिती :-

२०१६ मध्ये ६ हजार २३९ किशोरवयीन मुलांविरूद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. २०१५ चया ५ हजार ४८२ च्या तुलनेत त्यात ७५७ ने वाढ आहे. बाल गुन्हेगारीचे सर्वाधिक प्रमाण मुंबईचे आहे. त्यानंतर सातारा, पुणे, नागपूर शहर, ठाणे शहर, नाशिक शहर यांचा क्रमांक लागतो.किशोर वयीन गुन्हेगारांमध्ये १६ ते १८ वयोगटातील मुलांचा सर्वाधिक ७३.६५ टक्के इतका आहे तर १२ ते १६ वर्ष वयोगटातील मुलांचा सहभाग २४.७५ टक्के आहे. किशोरवयीन गुन्हेगारांमध्ये सर्वाधिक ९७.९४ टक्के मुले हे आपल्या कुटुंबासह राहतात. तर केवळ २.०६ टक्के किशोरवयीन गुन्हेगार निराधार आहेत.२५ हजार ते १ लाख रूपये वार्षिक उत्पन्न असलेल्या गटातील मुले बाल गुन्हेगारीत अधिक असल्याचे प्रकाशित आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. त्याचप्रमाणे नांदेड जिल्ह्यातही किशोरवयीन मुलांमध्येही व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्तीमध्ये वाढ होताना दिसून येत आहे याचाही अभ्यास करण्यात येईल.

(प) नांदेड जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांच्या व्यसनाधीनता व गुन्हेगारीची स्थिती :-

नांदेड जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांमध्ये व्यसनाधीनता व परिणामी गुन्हेगारी वृत्तीत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. किशोरवयीन मुले व्यसनाधीन होत चालली आहेत. व्यसनाची पूर्तता करण्यासाठी ते गुन्हेगारीवृत्तीकडे वळताना दिसून येत आहेत. गुंडागर्दी करणे, वाईट लोकांची संगत, अश्लिल भाषेचा वापर करणे, आई-वडिलांचे म्हणणे न ऐकणे इत्यादी

गोष्टी मुलांना अपराधी बनवतात यातूनच मुले गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळली जात आहेत याचा प्रस्तुत संशोधनातून अभ्यास करण्यात येणार आहे.

०.२ संशोधन साहित्याचा आढावा :-

१) **पाटील आर.के. (२००३)** यांनी "बालगुन्हेगार कायदेविषयक व गुन्हेगारीविषयक परिस्थितीचा अभ्यास" करताना बालगुन्हेगारांना योग्य ती न्यायव्यवस्था मिळणे गरजेचे आहे आणि त्यांच्या गरजा, विकास चांगला होण्यासाठी समाजाने आवश्यक ते प्रयत्न केले पाहिजे असे मांडले आहे. तसेच एखाद्या १६ वर्षाखालील मुलाला किंवा मुलीला बालगुन्हेगार म्हणून जर वागणूक मिळत असेल तर Uniform Age-एकसमान वयाचे वर्णन करावे असे मांडले आहे. भारताच्या राज्यघटनेच्या कलम २१ नुसार बालगुन्हेगार चार महिन्याच्या आत त्यांच्या केसचे Disposal करण्यात येण्याची खात्री करणे असे त्यांनी सुचविले आहे. बालगुन्हेगारांसाठी विशेषज्ञ, प्रशिक्षित शिक्षकांची निर्मिती करणे असे मत त्यांनी मांडले आहे.

२) **दुगावकर व्ही.(९ फेब्रुवारी २००७)** यांनी दैनिक सकाळ, औरंगाबाद या दैनिकामध्ये "बाल गुन्हेगार" हे नशेत घरची गरिबी, शिक्षणाचा अभाव, आई-वडिलांकडून होणारे दुर्लक्ष, संस्कारापासून कोसो दूर असलेले शहरातील लहान मुले, लहान-मोठ्या चोऱ्यांकडे वळली आहेत. टपऱ्या, मेडिकल दुकाने, जनरल स्टोअर्स फोडणारे हे बालगुन्हेगार आता सिगारेट, दारू नव्हे तर चक्क व्हाईटनरच्या नशेकडे वळली आहेत. या मुलांना रस्ता कसा दाखवावा हा प्रश्न पोलीस खात्याकडे आहे.

३) **युजीसी अनुदान आयोग (१९६७),** स्वावलंबी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वर्धा (१९६७) शहरातील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये गुन्हेगारीचा शोध घेणे यानुसार जास्तीत जास्त विद्यार्थी जे गुन्हेगार म्हणून आढळतात पण त्यांच्या स्वत:मध्ये गुन्हेगारी कमी प्रमाणात आढळते. अनुवंश व परिस्थिती या दोहोंचाही परिणाम होतो. तसेच

घरातील वातावरण दुषित असेल तर मुले बालगुन्हेगारीकडे वळली जातात. घरातील दारिद्र्य, बेकारी असल्यामुळे देखील मुले गुन्हेगारीकडे वळलेली दिसून येतात. उद्ध्वस्त कुटुंबातील अनैतिकता या कारणामुळे मुले गुन्हेगारीकडे वळलेली दिसून येतात.

४) **चितोडे मु.रा. (सप्टेंबर २००८)** यांनी दैनिक देशोन्नती या दैनिकामध्ये "दारूच्या नशेत १६ वर्षीय मुलाने आई-वडिलांना लाथा-बुक्क्या मारून ठार केले." दारूला मद्य, मदिरा, सुरा, सोमरस असे कितीतरी नावाने ओळखले जाते. परंतु त्याच जर मदिरेच्या आहारी गेल्यानंतर माणूस "माणूसपणा" विसरून जातो. मानवाचा दानव होतो व त्याला स्वतःचे जन्मदाते देखील दिसत नाहीत. १६ वर्षाचया मुलाने चक्क त्याच्या आई-वडिलांना ठार मारले. अशा प्रकारची मुले व्यसनाधीनतेतून गुन्हेगारीकडे वळलेली दिसून येतात.

५) **दैनिक लोकमत (दि.१ नोव्हेंबर २००८)** या दैनिकामध्ये "अल्पवयीन मुलास ताब्यात घेऊन पोलीसांनी दहा दुचाकी वाहने त्याच्याकडून जप्त केली." पुण्यातील कॅफे हाऊस, भंडारी क्लासेस, हिमनगरी सोसायटी अशा तीन ठिकाणाहून पंधरा वर्षांच्या मुलाने दुचाक्या चोरल्या. यामध्ये होंडा ॲक्टिवा कंपनीच्या आठ स्कूटर्स, एक मोटार सायकल, एक स्कुटी असा ऐवज चोरल्याची कबुली पोलीसांना दिली. अशा प्रवृत्तीची मुले बालगुन्हेगारीकडे वळलेली दिसून येतात.

०.३ संशोधन पद्धती :-

शास्त्रीय संशोधनाचा मूळ गाभा हा त्या संशोधनाच्या पद्धतीवर अवलंबून असतो. संशोधन कार्य यशस्वी होण्यासाठी संशोधनाचा उद्देश पूर्ण होण्यासाठी संशोधन पद्धतीचा खूप मोठा वाटा असतो. म्हणून प्रस्तुत संशोधन करण्यासाठी शास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाईल.

०.४ अध्ययन क्षेत्राची निवड :-

"नांदेड जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांची वाढती व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्ती : एक समाजशास्त्रीय अभ्यास" या विषयावर संशोधन करत असताना, संशोधनाचे क्षेत्र निश्चित करणे आवश्यक ठरते. संशोधन करताना सर्व बाबींमध्ये सुस्पष्टता असावी व अभ्यासात शास्त्रीयता असावी म्हणून अध्ययनाचे क्षेत्र निश्चित असावे लागते. प्रस्तुत अध्ययन विषयासाठी नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात आली असून, संशोधन विषयाची व्याप्ती संपूर्ण नांदेड जिल्हा आहे.

०.५ संशोधन विषयाचे महत्त्व :-

भारत देशात आज अनेक सामाजिक समस्या आहेत. पण त्यात सर्वात महत्त्वाची समस्या आहे 'व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्तीची' समस्या झपाट्याने वाढत आहे. व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्तीच्या मुलांकडे वाईट दृष्टिकोनातून पाहिले जाते. कारण या सामाजिक समस्येचे दुष्परिणाम त्या किशोरवयीन मुलांवर पर्यायाने त्या समाजावर होतात. याची जाणीव त्यांना समाजातील मुलांना व्यवस्थित समजून न घेतल्यामुळे व्यसनाधीन व गुन्हेगार होऊन त्या मुलांचा हट्टीपणा वाढतो. या व्यसनाधीन व गुन्हेगारीवृत्तीच्या मुलांमध्ये शारीरिक व मानसिक विकृती निर्माण होतात. याचे संशोधन करणे महत्त्वाचे आहे. किशोरवयीन व्यसनाधीन मुले गुन्हेगारीवृत्तीकडे का वळतात? त्यांच्यात व्यसनाधीन व गुन्हेगार होण्यामागील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक कारणांचे अध्ययन करणे गरजेचे आहे. शासनाच्या विविध उपाययोजना यांचेही अध्ययन व्हावे यासाठी प्रस्तुत अध्ययन करण्यात येणार आहे.

०.६ अध्ययन विषयाची निवड :-

"नांदेड जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांची वाढती व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्ती : एक समाजशास्त्रीय अभ्यास" हा विषय प्रस्तुत संशोधनासाठी निवडला आहे.

व्यसनाधीनतेमुळे किशोरवयीन मुलांचे आरोग्य धोक्यात येत आहे. तसेच व्यसनाधीनतेमुळे ते गुन्हेगारीवृत्तीकडे वळत आहेत. याचा परिणाम त्यांच्या कुटुंबावर व परिणामी समाजावर होत आहे. यामुळे चारित्र्यसंपन्न नागरिक निर्माण होण्यास अडथळा निर्माण होत आहे.

नांदेड जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांच्या वाढत्या व्यसनाधीनतेमुळे त्यांना त्यांच्या व्यसनाची पूर्तता करण्यासाठी घरात चोरी करणे, छोट्या-मोठ्या चोरी करणे यातून गुन्हेगारीवृत्तीकडे वळत असल्यामुळे यास आळा बसवण्यासाठी प्रस्तुत अध्ययन विषयाची निवड केली आहे.

०.७ संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१) व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्ती ही एक सामाजिक समस्या आहे. याचा अभ्यास करणे.

२) किशोरवयीन मुलांमध्ये व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्तीची वाढ झाल्यामुळे ते शिक्षणापासून वंचित होतात त्यामुळे निरक्षरता व अज्ञान वाढते का? याचे अध्ययन करणे.

३) व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्तीचा किशोरवयीन मुलांवर व समाजावर दुष्परिणाम होतात याचा शोध घेणे.

४) भावी तरूण पिढीस व्यसन व गुन्हेगारीपासून मुक्त ठेवणे.

५) सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने किशोरवयीन मुलांमध्ये वाढती व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्ती कल्याणकारी राज्यास अडथळा आहे.

६) तरूण पिढीस व्यसनापासून व गुन्हेगारी व्यक्तीवर नियंत्रण आणता येईल का? याचा अभ्यास करणे.

०.८ संशोधनाची गृहितकृत्ये :-

१) व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्ती या समस्येचा किशोरवयीन मुलांच्या जीवनावर विपरीत परिणाम होतो.

२) व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्तीमुळे निरक्षरता व अज्ञानात वाढ होते.

३) व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्तीमुळे कल्याणकारी राज्यास अडथळा निर्माण होतो.

४) व्यसनाधीनता व गुन्हेगारी वृत्तीमुळे समाजात भावी चारित्र्यसंपन्न, आदर्श व्यक्ती निर्माण होण्यास अडथळे निर्माण होतात.

५) व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्तीच्या किशोरांना विविध आजार दिसून येतात.

६) कुटुंबाच्या व्यसनाधीनवृत्तीमुळे व गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे किशोरवयीन मुलेही व्यसनाधीन व गुन्हेगारीवृत्तीकडे वळतात.

७) व्यसनाधीनतेमुळे किशोरवयीन मुलांचे सामाजिक, आर्थिक, मानसिक शोषण होते.

०.९ संशोधन आराखडा :-

कोणत्याही विषयाच्या संशोधनासाठी संशोधन आराखडा तयार करणे आवश्यक असते.ञ संशोधन आराखड्याशिवाय वस्तुनिष्ठ संशोधन करणे शक्य नसते. त्यासाठी संशोधनास सुरूवात करण्यापूर्वी संशोधनाचा आराखडा तयार करावा लागतो. शास्त्रीयदृष्ट्या संशोधन कार्याची रूपरेषा तयार करणे म्हणजे संशोधन आराखडा होय. प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी वर्णनात्मक आणि निदानात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात येणार आहे.

०.१० नमूना निवड पद्धती :-

नांदेड जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांची वाढती व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्ती : एक समाजशास्त्रीय अभ्यास करण्यासाठी गैरसंभाव्यता नमूना निवड पद्धती अंतर्गत 'सहेतूक नमूना निवड पद्धती' ने नमूना निवडला जाईल. नांदेड जिल्ह्यात असलेल्या एकूण १६ तालुक्यांचा प्रातिनिधीक नमूना घेतला जाईल. त्यातून प्रत्येक तालुक्यातून २० उत्तरदात्यांची निवड करण्यात येईल. (२० x १६ = ३२०) अशाप्रकारे प्रातिनिधीक तत्त्वावर प्रत्येक तालुक्यातून २० नमुना घेतला जाईल.

०.११ तथ्य संकलन पद्धती :-

नांदेड जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांची वाढती व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्ती यांचा शोध एक समाजशास्त्रीय अभ्यास हा विषय अभ्यासत असताना संशोधन कार्यासाठी प्राथमिक तथ्य संकलन व द्वितीय तथ्य संकलन पद्धती अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

अ) प्राथमिक तथ्य संकलन :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक साधनसामुग्रीचा वापर करण्यात येणार असून त्यात प्राथमिक संशोधनामध्ये मुलाखत अनुसूची आणि प्रत्यक्ष पाहणी इत्यादीद्वारे प्राथमिक तथ्य संकलित करण्यात येईल.

ब) द्वितीय तथ्य संकलन :-

द्वितीय तथ्य संकलनामध्ये पूर्वी संशोधन केलेले शोधप्रबंध, प्रकाशित ग्रंथ, शासकीय अहवाल, इंटरनेटवरील माहिती, संकेतस्थळे, मासिके, पाक्षिक, दैनिक वर्तमानपत्रे इत्यादी विषयाशी संबंधित प्रकाशित माहिती, साहित्य इत्यादी द्वितीय तथ्य संकलनाचा संशोधनासाठी वापर करण्यात येणार आहे.

०.१२ तथ्यांचे वर्गीकरण, विश्लेषण, निर्वचन व निष्कर्ष :-

प्रस्तुत संशोधनासाठी संकलित केलेल्या तथ्यांचे सारणीकरण करून त्याचे योग्य प्रकारे विश्लेषण केले जाईल. संकलित तथ्यांचे योग्य त्याप्रमाणे आलेख व सारणीद्वारे संकलित तथ्यांचे सांख्यिकीय व गुणात्मक पद्धतीने तथ्य विश्लेषण करण्यात येईल.

०.१३ संशोधन अहवाल लेखन :-

प्रस्तुत संशोधनामध्ये "नांदेड जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांची वाढती व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्ती : एक समाजशास्त्रीय अभ्यास" या विषयाला अनुसरून किशोरवयीन मुलांमधील

वाढती व्यसनाधीनता व गुन्हेगारीवृत्तींचा अभ्यास करण्यात येईल. किशोरवयीन मुले कोणास म्हणावे? व्यसनाधीनता व गुन्हेगारी म्हणजे काय? त्यांचा समाजातील दर्जा यांचाही अभ्यास केला जाईल. नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील किशोरवयीन मुलांचे कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक इत्यादी बाबींवर प्रकाश टाकण्यात येईल. त्यासाठी मुलाखत अनुसूची या तंत्राचा वापर करून संशोधनाचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यासाठी प्रकरणांचे वर्गीकरण करून त्यासंबंधीचे तथ्य संकलित करून माहितीचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण केले जाईल.

०.१४ प्रकरणीकरण :-

प्रस्तुत संशोधनाची मांडणी व्यवस्थित व्हावी म्हणून संशोधनाचे प्रमुख पैलू विचारात घेऊन संशोधकाने प्रस्तुत प्रबंधाची मांडणी खालील सहा प्रकरणात केली आहे.

प्रकरण पहिले : **प्रस्तावना**

प्रकरण दुसरे : **संशोधन साहित्याचा आढावा व संशोधन पद्धती**

प्रकरण तिसरे : **किशोरवयीन मुलांची कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक पार्श्वभूमी.**

प्रकरण चौथे : **किशोरवयीन मुलांची आर्थिक पार्श्वभूमी**

प्रकरण पाचवे : **किशोरवयीन मुलांची आरोग्यविषयक पार्श्वभूमी**

प्रकरण सहावे : **निष्कर्ष, उपाययोजना व शिफारशी**

संदर्भग्रंथसूची :-

१. गोखले डॉ.शरदचंद्र, "सामाजिक विकासाचे प्रश्न आणि धोरण", व्हीनस प्रकाशन, पुणे.

२. आहुजा राम, "भारतीय समाजातील समस्या", रावत प्रकाशन, नवी दिल्ली.

३. माने प्रा.माणिक, "गुन्हेगारी शास्त्र", फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४. आगलावे प्रा.प्रदीप, "सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

५. जगताप ह.ना., "शैक्षणिक मानसशास्त्र", नरेंद्र प्रकाशन, नागपूर.

६. खडसे डॉ.भा.कि., "भारतीय सामाजिक समस्या", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

७. तोटरे प्रा.मनोहर, "समाजशास्त्र", विद्याभारती प्रकाशन, लातूर.

८. कांडलकर डॉ.लोना सुनील, "किशोरावस्था आणि मूल्यशिक्षण", बोके प्रकाशन, गांधीनगर, अमरावती.

९. कुलकर्णी प्रा.पी., "गुन्हेगारीचे समाजशास्त्र", विद्या प्रकाशन, नागपूर.

१०. www.shodhganga.com

संशोधक
बाऱ्हाळीकर रामदास माधवराव
सामाजिकशास्त्रे संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक
प्रा.डॉ.दत्ता किशनराव कदम
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, ता.हिमायतनगर, जि.नांदेड